# प्रेस नोट

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४, मुंबई यांच्या आदेशान्वये दिनांक १०/१२/२०२४ ते दिनांक २५/१२/२०२४ या कालावधीत गुन्हयात चोरीस गेलेले मोबाईल व गहाळ मोबाईल यांचा शोध घेणेकामी परिमंडळ ४ अंतर्गत विशेष मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते. सदर मोहीमेकरिता मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४, मुंबई यांनी परिमंडळातील प्रत्येक पोलीस ठाणेची वेगवेगळी पथके बनविली होती. सदर पथकाने सन २०२४ या वर्षात गुन्हयात चोरीस गेलेले मोबाईल व गहाळ मोबाईल यांची यादी बनवून तांत्रिक पध्दतीने शोध घेतला. त्यानंतर मुंबई, महाराष्ट्र व इतर राज्यात पोलीस पथके पाठवून दिनांक १०/१२/२०२४ ते दिनांक २५/१२/२०२४ या कालावधीत एकूण २१३ मोबाईल हस्तगत करण्यात आलेले असून त्याची अंदाजे किंमत रू. २८,८८,७०८/– अशी आहे. सदर मिळून आलेले सर्व मोबाईल आज दिनांक ३०/१२/२०२४ रोजी मानव सेवा संघ, सायन, मुंबई येथे कार्यक्रम आयोजित करून तक्रारदार यांना परत करण्यात आलेले आहेत.

सदरची मोबाईल हस्तगत करण्याची कार्यवाही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. सत्यनारायण, सह पोलीस आयुक्त (का. व सु.), बृहन्मुंबई, श्री. अनिल पारस्कर, अप्पर पोलीस आयुक्त, मध्य प्रादेशिक विभाग, बृहन्मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती रागसुधा आर., पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४, मुंबई यांनी आयोजित करून सहाय्यक पोलीस आयुक्त, भोईवाडा विभाग, माटुंगा विभाग, सायन विभाग, व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भोईवाडा पोलीस ठाणे, काळाचौकी पोलीस ठाणे, मांटुगा पोलीस ठाणे, आर.ए. किडवाई मार्ग पोलीस ठाणे, सायन पोलीस ठाणे, अॅन्टॉप हिल पोलीस ठाणे, वडाळा टी.टी. पोलीस ठाणे, व परिमंडळातील ०९ अधिकारी + २३ अमंलदार यांच्या मार्फतीने राबविलेली आहे.

(रागसुधा आर.)
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ ४, मुंबई